परिपत्रक

क्र.पोमसं/१६/८३००/सद्भावना दिवस/६७/२०१६-२०२२ मुंबई, दिनांक :- १७/०८/२०२२

विषय :- दिनांक २० ऑगस्ट, २०२२ **"सद्भावना दिवस"** व दिनांक २० ऑगस्ट, २०२२ ते ०५ सप्टेंबर, २०२२ हा पंधरवडा **"सामाजिक ऐक्य पंधरवडा"** म्हणून साजरा करण्याबाबत.....

****

उपरोक्त विषयाबाबतच्या शासन परिपत्रक, अल्पसंख्यांक विकास विभाग, क्र. अविवि-२०२२/प्र.क्र.५०/का.८, दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ व सामान्य प्रशासन विभाग, क्र. जपुती . २०२२/ प्र.क्र.१४८/कार्या.२९ ची प्रत माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

२. तरी, दिनांक २० ऑगस्ट, २०२२ रोजी शनिवार शासकिय सुट्टी असल्याकारणाने, **गुरूवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी " सद्भावना दिवस "** निमित्ताने शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करण्याबाबत सुचित केले आहे. तरी खालील घटकप्रमुखांनी त्यांच्या कार्यालयात गुरूवार, दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी शपथ घेण्याचा कार्यक्रम आयोजित करावा, तसेच दिनांक २० ऑगस्ट, २०२१ ते ०५ सप्टेंबर, २०२१ पर्यंत **"सामाजिक ऐक्य पंधरवडा"** म्हणून साजरा करावा.

(एस. जयकुमार)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई **(सस्नेह)**
महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. **(सस्नेह)**
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक तथा संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल / प्रशिक्षण व खास पथके / आर्थिक गुन्हे / फोर्स वन / दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस आयुक्त, लोहमार्ग, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर गुन्हे / ना.ह.सं., महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, रारापोबल, पुणे/नागपूर.
सर्व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली कॅम्प नागपूर.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)/विशेष कृती, नागपूर.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटीकरण केंद्र, नाशिक.
प्राचार्य, अपारंपरिक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर.

सद्भावना दिवस प्रतिज्ञा

" मी अशी प्रतिज्ञा करतो / करते की, मी जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करीन. मी आणखी अशी प्रतिज्ञा करतो / करते की, आमच्यामधील वैयक्तिक किंवा सामुहिक स्वरूपाचे सर्व प्रकारचे मतभेद मी हिंसाचाराचा अवलंब न करता विचार विनिमय करून व संविधानिक मार्गांनी सोडवीन."

दि.२० ऑगस्ट, २०२२ हा दिवस "सद्भावना दिवस" व दि. २० ऑगस्ट, २०२२ ते दि.५ सप्टेंबर, २०२२ हा पंधरवडा "सामाजिक ऐक्य पंधरवडा" म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः अविवि-२०२२/प्र.क्र.५०/का.८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १७ ऑगस्ट, २०२२

शासन परिपत्रक -

युवा व क्रिडा मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या निदेशानुसार दिवंगत पंतप्रधान मा.राजीव गांधी यांचा जयंती दिवस २० ऑगस्ट हा दिवस दरवर्षी "सद्भावना दिवस" म्हणून साजरा करण्यात येतो. तसेच मानव संसाधन विकास मंत्रालय, भारत सरकार यांच्या कार्यालयीन ज्ञापन क्र.एफ-२८-२२/२००६-वा.एस-४, दि.१८ जुलै, २००६ अन्वये देण्यात आलेल्या निदेशास अनुसरुन, उपरोक्त सद्भावना दिवसाच्या अनुषंगाने दि. २० ऑगस्ट, २०२२ ते दि ५ सप्टेंबर, २०२२ हा पंधरवडा "सामाजिक ऐक्य पंधरवडा" म्हणून साजरा करण्याचे शासनाने ठरविले आहे. राज्यातील विविध प्रदेशातील अनेक धर्मांच्या व अनेक भाषा बोलणाऱ्या लोकांमध्ये एकमेकांविषयी ऐक्याची भावना, सौहार्द भाव वृध्दीगंत करणे व हिंसाचार टाळणे ही प्रमुख उद्दीष्ट्ये पंधरवडा साजरा करण्यामागे आहेत.

२. दि. २० ऑगस्ट, २०२२ हा "सद्भावना दिवस" म्हणून साजरा करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

अ) मंत्रालयाच्या प्रांगणात दि. २० ऑगस्ट, २०२२ रोजी "सद्भावना दिवस" साजरा करण्यात यावा व सर्व उपस्थितांना सद्भावना दिवसाची प्रतिज्ञा घेण्यास सांगण्यात यावे, तसेच या दिवशी सद्भावना शर्यत आयोजित करण्यात यावी. याबाबत प्रतिज्ञेची प्रत सोबत जोडली आहे.

ब) बृहन्मुंबईत लोकांच्या विशेषत: युवकांच्या सहभागाने संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य यांनी सद्भावना या विषयावर समुहगान आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत.

क) महसूल विभागाच्या आयुक्तांनी सद्भावना शर्यत आयोजित करावी. त्यांच्या कार्यालयात सद्भावना दिवसाची प्रतिज्ञा घेण्याचा कार्यक्रम आयोजित करावा. (शर्यतीची कार्यपध्दती आणि प्रतिज्ञेचा नमुना सोबत जोडला आहे.)

ड) राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालये व सर्व शासकीय कार्यालये यामध्ये कार्यालय प्रमुखांच्या अध्यक्षतेखाली सर्वधर्म प्रार्थना सभा घेण्यात यावी व सर्व उपस्थितांना सद्भावना शपथ घेण्यास सांगण्यात यावे. तसेच सद्भावना शर्यत आयोजित करावी (नमुना सोबत जोडला आहे). तसेच युवकांच्या सहभागाने सद्भावना या विषयावर समुहगान आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत.

इ) विद्यापीठे, महाविद्यालये आणि शाळांमध्ये सुध्दा अशाच तऱ्हेचे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत. या विषयीचे आवश्यक ते आदेश शालेय शिक्षण तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभागाने संबधितांना द्यावेत. नेहरू युवा केंद्र, भारत स्काऊट आणि गाईडस व राष्ट्रीय सेवा योजना यांना देखील कार्यक्रमामध्ये सहभागी करून घेण्यात यावे.

३. याशिवाय दिनांक २० ऑगस्ट, २०२२ ते ५ सप्टेंबर २०२२ हा पंधरवडा “सामाजिक ऐक्य पंधरवडा” म्हणून राज्यात साजरा करण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

अ) सामाजिक ऐक्याचा संदेश प्रसृत करण्यासाठी मानवी साखळी (Human Chain) सारखे कार्यक्रम राज्यातील जिल्हा मुख्यालयात संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करावेत.

आ) जिल्हाधिकाऱ्यांनी युवक परिषदा आयोजित करून त्यामध्ये जिल्हातील प्रख्यात स्वातंत्र्य सैनिकांना भाषण देण्यासाठी निमंत्रित करावे.

इ) सदर पंधरवड्यात जिल्हाधिकाऱ्यांनी इतर सांस्कृतिक कार्यक्रम सुध्दा आयोजित करावेत.

ई) संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर पंधरवडयामध्ये बृहन्मुंबईत सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत.

४. उपरोक्त “सद्भावना दिवस” व “सामाजिक ऐक्य पंधरवडा” या कार्यक्रमांच्या प्रसिध्दीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दूरदर्शन व आकाशवाणीच्या स्थानिक अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कार्यक्रमांना पुरेशी प्रसिध्दी द्यावी.

५. उपरोक्त कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याची खबरदारी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी घ्यावी व कार्यक्रम पार पाडल्यानंतर शासनास त्याचा अहवाल सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक २०२२०८१७१२४२५४७८१४ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

(आ. उ. पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा.मुख्य सचिव,
५) अपर मुख्य सचिव (का.२९),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई
६) सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव /सचिव मंत्रालय,मुंबई,
७) अपर मुख्य सचिव, कृषि विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई
१३) सर्व मंत्रालयीन विभाग,

१४) सर्व विभागीय आयुक्त,

१५) कुलसचिव, सर्व विद्यापीठे,

१६) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई

१७) पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,मुंबई

१८) सर्व पोलिस आयुक्त,

१९) सर्व जिल्हाधिकारी,

२०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद

२१) महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई (प्रसिध्दीसाठी)

२२) कक्ष अधिकारी,माहिती व तत्रंज्ञान महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई (२ प्रती वेबसाईट)

२३) कक्ष अधिकारी,सामान्य प्रशासन विभाग/का.२९,मंत्रालय,मुंबई यांना कार्यक्रम आयोजनाच्या विनंतीसह

२४) निवड नस्ती (का.८).

<u>सद्भावना दिवस प्रतिज्ञा</u>

मी अशी प्रतिज्ञा करतो / करते की, मी जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करीन. मी आणखी अशी प्रतिज्ञा करतो / करते की, आमच्यामधील वैयक्तिक किंवा सामुहिक स्वरूपाचे सर्व प्रकारचे मतभेद मी हिंसाचाराचा अवलंब न करता विचार विनिमय करून व संविधानिक मार्गांनी सोडवीन.

****

SADBHAVANA DAY PLEDGE

"I take this solemn pledge that I will work for the emotional oneness and harmony of all the people of India regardless of caste, creed, region, religion or language. I further pledge that I shall resolve all differences among us through dialogue and constitutional means without resorting to violence."

सद्भावना शर्यत आयोजित करण्यासाठी तपशिलवार सूचना

सद्भावना शर्यतीचे उद्दिष्ट

सद्भावना शर्यतीचे उद्दिष्ट पुढीलप्रमाणे आहे :-

अ) सर्व वयोगटांतील लोकांमध्ये शारिरीकदृष्टया निरोगी राहण्याची सवय निर्माण करणे.

ब) सर्व वयाच्या, सर्व वर्गाच्या आणि सर्व धर्माच्या सर्व भाषिकांच्या लोकांमध्ये एक प्रकारचा बंधुभाव व सलोखा वाढीस लावणे.

या सर्व गोष्टी साध्य करण्यासाठी समाजाच्या सर्व स्तरावरील सर्व वयोगटातील लोकांना, महिला व पुरुषांना या शर्यतीमध्ये भाग घेण्यासाठी उत्तेजन देणे इष्ट ठरेल. सद्भावना शर्यतीत सहभाग ही महत्वाची गोष्ट आहे. या शर्यतीचे घोषवाक्य भारत - निरोगी आणि समर्थ भारत हे आहे.

शर्यत आयोजित करण्याची कार्यपध्दती

सर्वसाधारणपणे ही शर्यत ठराविक ठिकाणी सुरु झाली पाहिजे आणि ठराविक ठिकाणी संपली पाहिजे, हे अंतर साधारणतः ३ ते ५ किलोमीटर असावे. जमिनीचा चढउतार व शर्यतीच्या ठिकाणचे हवामान याप्रमाणे त्यात थोडाफार बदल करावा. तथापि, भाग घेणाऱ्या लोकांची संख्या मोठी असेल तर शर्यती वेगवेगळया ठिकाणापासून सुरु करता येतील आणि एकाच ठिकाणी संपविता येतील, भाग घेणाऱ्या लोकांची एकूण संख्या लक्षात घेऊन साधारण दोनशे ते अडीचशे लोकांना तुकडी तुकडीने हिरवा झेंडा दाखववावा. प्रत्येक प्रारंभाच्या ठिकाणी एक छोटा चबुतरा असावा आणि त्यावरून अतिविशेष व्यक्तीने, वेगवेगळया तुकडयांना हिरवा झेंडा दाखववावा. प्रत्येक प्रारंभाच्यावेळी, वेगवेगळया तुकडयांमध्ये लोकांना विभागता यावे या दृष्टीने, त्यांना सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपण सामग्रीची व्यवस्था करावी.

पाण्याच्या आणि वैद्यकीय सुविधा

शर्यतीच्या मार्गावर आणि शर्यत संपते त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची तसेच प्रथमोपचाराची पुरेशी सुविधा असावी. वैद्यकीय मदतीसाठी योग्य व्यवस्था असावी.

आयोजकांसाठी प्रशिक्षण वर्ग

या शर्यतीमध्ये, वृध्द माणसे, स्त्रिया, लहान मुले असे सर्वच भाग घेतील अशी अपेक्षा आहे. त्यादृष्टीने आयोजनात भाग घेणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी सूचनावजा एक शैक्षणिक सत्र प्रत्यक्ष शर्यतीच्या दोन दिवस आधी घेणे इष्ट ठरेल. त्यामुळे व्यवस्थेबाबत काही शंका असतील तर त्यांचा उलगडा होईल.

संकीर्ण

शर्यतीत भाग घेणाऱ्यांनी शक्यतो धावताना घालतात ते बूट घालावेत, चपला शक्यतो टाळाव्यात. शर्यतीत भाग घेणाऱ्यांना शर्यतीच्या पोषाखातच हजर राहण्यास सांगावे. त्यामुळे कपडे

बदलण्याच्या खोल्या किंवा चीजवस्तू ठेवण्यासाठी जागा अशी जास्तीची प्रशासकीय व्यवस्था करावी लागणार नाही. मुलांना खाण्याचे डबे न आणण्याविषयी सूचना द्याव्यात.

प्रसिध्दी

लोकांनी मोठया प्रमाणावर सहभाग घ्यावा या दृष्टीने जनसंपर्क माध्यमातून, भित्तीपत्रकांच्याद्वारे, हँडबिले इ. वाटून भरपूर प्रसिध्दी देण्यात यावी. शिवाय, शर्यतीच्या तारखेच्या दोन दिवस आधी एक पत्रकार परिषद आयोजित करण्यात यावी. या परिषदेत शासनाच्या सचिवांनी किंवा इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सूचना द्याव्यात. शर्यतीचा मार्ग, तारीख व वेळ प्रसिध्द करण्यात यावी. वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग कोणते ते देखील सांगावेत.

शर्यतीचे आयोजन व तांत्रिकदृष्ट्या संचालन

शर्यत आयोजित करण्यासाठी व तांत्रिकदृष्टया तिच्या संचालनासाठी पुढील मार्गदर्शक तत्वे सांगण्यात येत आहेत :-

(१) शर्यती आयोजित करण्यास जबाबदार अधिकारी शक्यतो एकाच ठिकाणचे घ्यावेत म्हणजे जादा खर्च टाळता येईल. शर्यतीच्या संचालनाच्या पध्दतीबाबत त्यांना अत्यंत स्पष्ट अशी कल्पना असावी. त्यांना सूचना देण्यासाठी ३ दिवस आधीच सर्व संघटक अधिकाऱ्यांची बैठक बोलवावी.

(२) शर्यतीच्या प्रारंभाचे ठिकाण मोकळया मैदानावर असणे आवश्यक आहे. कारण त्या ठिकाणी भाग घेणारे नीट जमू शकतात व त्यांचे २०० ते २५० जणांचे गट करता येतात. एका गटाला एका वेळी धावयाला सांगता येईल व दोन गटांमध्ये साधारण २ ते ३ मिनिटांचा कालावधी वाजवी ठरेल. अशा रितीने गडबड-गोंधळ व चेंगराचेंगरी टाळावी. शर्यतीच्या प्रारंभाचे आदर्श ठिकाण सांगावयाचे झाल्यास गर्दीचे रस्ते किंवा गर्दीचे चौक यापासून दूर, एखादे स्टेडियम त्यासाठी योग्य ठरेल, फार मोठया संख्येने लोकांनी भाग घेतल्यास, शर्यत वेगवेगळया प्रारंभ स्थानापासून सुरु करावी व गर्दी टाळावी.

(३) शर्यत संपण्याचे ठिकाण देखील मोकळया मैदानावरच असावे. शक्यतो एखादे स्टेडियम किंवा मोठे क्रीडांगण निवडणे जास्त चांगले. तेथे भाग घेणाऱ्या लोकांना शर्यतीनंतर आपापल्या वाटेने जाण्यासाठी पुरेशी जागा मिळते. ही शर्यत स्पर्धात्मक नसल्यामुळे शर्यत संपते त्या ठिकाणी हद्द आखण्याची किंवा फीत बांधण्याची गरज नाही. गडबड गोंधळ टाळण्यासाठी ही शर्यत म्हणजे स्पर्धा नव्हे हे वारंवार घोषित करण्यात यावे.

(४) धावणाऱ्यांच्या पुढे मोटार सायकलवर / स्कूटरवर / मोटार वाहनातून पथदर्शक पाठविण्यात यावेत. या पथदर्शक वाहनांनी लाल झेंडा दाखवत जावे आणि शर्यतीचा मार्ग मोकळा ठेवावा. धावणारे जरी रस्त्याच्या एकाच बाजूने धावत असले तरीसुध्दा रस्त्याच्या दोन्ही बाजूची वाहनांची ये-जा थांबवणे आवश्यक आहे.

(५) शर्यतीच्या मार्गावर रहदारीचे नियंत्रण करण्यासाठी योग्य त्या संख्येने मोटार सायकली / स्कूटर / मोटार वाहने तैनात करावीत. त्यांनी धावणाऱ्यांकडे लक्ष ठेवावे. कोठेही कोंडी किंवा गर्दी झाल्यास, ती मोकळी करावी.

(६) सहभागी होणाऱ्या लोकांची संभाव्य संख्या व शर्यतीचे अंतर लक्षात घेऊन योग्य संख्येने रुग्णवाहिका, डॉक्टर व वैद्यकीय सामग्री उपलब्ध करून द्यावी. कमीत कमी एक रुग्णवाहिका तरी असेल व ती शर्यतीच्या पाठीमागून जाईल. शर्यतीच्या मार्गावर आणि शर्यत संपते त्या ठिकाणी प्रथमोपचार केंद्र देखील तैनात करता येतील.

(७) शर्यतीचा मार्ग काळजीपूर्वक ठरवला पाहिजे. शर्यतीत धावणाऱ्या सर्व व्यक्ती, आयोजक अधिकारी व वाहतूक पोलीस या सर्वांना रस्त्याचा नकाशा पुरवण्यात यावा. सर्वसाधारणपणे अति दाट वाहतुकीचे रस्ते, बाजारपेठा, शाळा, व्यापारी केंद्र हा भाग वगळावा.

(८) रस्त्याच्या चौकांमध्ये तसेच सर्व मोठया वाहतूक चौकामध्ये व रस्ते ओलांडणीच्या ठिकाणी पुरेशा संख्येने वाहतूक पोलीस ठेवण्यात यावेत. शर्यत चालू होण्यापूर्वी अर्धा तास सर्व वाहतूक थांबवण्यात यावी. पहिला स्पर्धक शेवटच्या बिंदूला पोचल्यानंतर निदान अर्ध्या तासाने रस्ते वाहतूकीला खुले करावेत.

(९) ज्यावेळी मार्गावरील वाहतूक कमीत कमी असेल अशी वेळ शर्यतीसाठी निवडण्यात यावी. उदा. सकाळी जेवढया लवकर शक्य असेल तेवढया लवकर शर्यती घ्याव्यात.

(१०) धावण्याचे अंतर लक्षात घेऊन धावण्याच्या मार्गावर सहभागी व्यक्तींसाठी खानपान सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करावी. प्रत्येक पाणपोईच्या ठिकाणी पुरेसे पाणी आहे याची खातरजमा करावी. पाणी पिण्याकरिता कागदाचे कप पुरेसे आहेत याची खातरजमा करावी. पाणपोईवर निदान दोन मदतनीस असावेत. शर्यत संपते त्या ठिकाणी, पाण्याचे टँकर / लॉरी उपलब्ध ठेवावी, असे सूचविण्यात येत आहे.

(११) पथदर्शक वाहने, रुग्णवाहिका, वाहतूक पोलीस व संघटक अधिकारी या सर्वांना परस्परांशी संपर्क साधणे सहज शक्य व्हावे या दृष्टीने तसेच गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी शर्यतीच्या सुरुवातीस, शेवटी या मार्गावर वॉकी-टॉकी, ध्वनीक्षेपक इ. संपर्क सुविधा पुरेशा प्रमाणात द्याव्यात.

(१२) आयोजनात भाग घेणारे सर्व अधिकारी, वैद्यकीय कर्मचारी व वाहतूक पोलीस या सर्वांना शर्यतीचा सर्व तपशिल अगदी नीटपणे सांगण्यात यावा. अपघात होऊ नयेत, धावणाऱ्यांना इजा होऊ नये यादृष्टीने विशेष काळजी घेणे व दक्षता घेणे किती गरजेचे आहे ते त्यांना सांगण्यात यावे. या कारणासाठी एक विशेष बैठक बोलवावी.

(१३) धावण्याचे अंतर लक्षात घेता, जे लोक शारिरीकदृष्टया योग्य स्थितीत नाहीत हे स्पष्ट दिसत आहे किंवा त्यांचे वय शर्यतीला योग्य नाही अशा लोकांना शर्यतीत भाग घेण्यापासून परावृत्त करावे.

(१४) मार्गावर दोन्ही बाजूंना प्रेक्षकांची होणारी गर्दी टाळणे व तिच्यावर पोलीस/ स्वयंसेवक/ निमलष्करी व्यक्ती त्यांच्याकरवी कडक नियंत्रण ठेवणे अतिशय आवश्यक आहे. त्यांनी शर्यतीच्या रस्त्यावर प्रेक्षकांना प्रवेश करू देऊ नये किंवा तो रस्ता ओलांडून देऊ नये.

****

सद्भावना दिनानिमित्ताने सद्भावना दिवस प्रतिज्ञा घेणे व स्व. राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अपर्ण करण्याचा कार्यक्रम.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. जपुती २०२२/प्र.क्र.१४८/कार्या.२९,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक -१७ ऑगस्ट, २०२२

वाचा-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.जपुती २०२१/प्र.क्र.११२/कार्या.२९, दि.३१.१२.२०२१.
२) युवा कल्याण आणि क्रिडा मंत्रालय, भारत सरकार जे-१७०११/४४९/२१ २०२२-एनपीवायअेडी, दि.१२.०८.२०२२ चे पत्र.

परिपत्रक-

संदर्भाकित अनु.क्र.१ येथील दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ च्या शासन परिपत्रकान्वये दिनांक २० ऑगस्ट, २०२२ रोजी सद्भावना दिवस प्रतिज्ञा घेणे व स्व.राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. तथापि, युवा कल्याण आणि क्रिडा मंत्रालय, भारत सरकार यांनी अ.क्र.२ येथील दिनांक १२.०८.२०२२ च्या पत्रान्वये दिनांक २० ऑगस्ट, २०२२ ऐवजी दिनांक १८ ऑगस्ट,२०२२ रोजी सद्भावना दिवस प्रतिज्ञा घेणे व स्व.राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्याबाबत सूचित केले आहे. (प्रत सोबत जोडली आहे.)

३. यास्तव, युवा कल्याण आणि क्रिडा मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक १२.०८.२०२२ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांच्या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करावी व सद्भावना दिवस प्रतिज्ञा घेणे व स्व.राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम वेळेत घेण्यात यावा, असे याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

४. राज्यातील कोरोना विषाणूच्या प्रसार रोखण्याबाबत आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या अनुषंगाने कमीत कमी अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत योग्य सामाजिक अंतर ठेवून व तोंडाला मास्क लावून त्याचप्रमाणे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करुन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्यांचा संकेतांक २०२२०८१७१७२९३३५१०७ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

(सु. ज. तुमराम)
कार्यासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव/सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, (प्र.सु.र.व.का.) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, सदरची बाब आपल्या अखत्यारीत असलेल्या सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयाच्या निदर्शनास आणावी व त्यानुसार सदरचा कार्यक्रम साजरा करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
८. सर्व मंत्रालयीन विभाग.
९. सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी/सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी/आयुक्त, सर्व महानगरपालिका यांना विनंती करण्यात येते की, सदरची बाब आपल्या अखत्यारीत असलेल्या सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयाच्या निदर्शनास आणावी व त्यानुसार सदरचा कार्यक्रम साजरा करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
१०. निवासी आयुक्त महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली.
११. निवड नस्ती (कार्या.२९).

सद्भावना दिवस प्रतिज्ञा

“मी अशी प्रतिज्ञा करतो/ करते की, मी जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेचे भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करीन. मी आणखी अशी प्रतिज्ञा करतो/करते की, आमच्यामधील सर्व प्रकारचे मतभेद मी हिंसाचाराचा अवलंब न करता विचार विनिमय करुन व संविधानिक मार्गाने सोडवीन.”

****

F. No. J-17011/449/2022-NPYAD
Government of India
Ministry of Youth Affairs and Sports
Department of Youth Affairs

Shastri Bhawan, New Delhi-1,
Dated the 12th August, 2022

OFFICE MEMORANDUM

Subject: Observance of 'Sadbhavana Diwas' on 20th August, 2022 – reg.

The birth anniversary of former Prime Minister Late Shri Rajiv Gandhi is observed as 'Sadbhavana Diwas' on 20th August every year. The theme of Sadbhavana is to promote National Integration and Communal Harmony among people of all religions, languages and regions. The idea behind observance of 'Sadbhavana Diwas' is to eschew violence and to promote goodwill among the people.

2. This year, the 20th August is falling on a Saturday which is a closed holiday for Central Government Offices and 19th August, 2022 too is a Gazetted holiday on account of Janamashtami festival. Therefore, in partial modification to the O.M. of even No. dated 11th August 2022, this year, the sadbhavana Pledge taking ceremony may be observed on **18th August, 2022.**

3. All Ministry/Department/Ogranisations are, therefore, requested to organize an appropriate function wherein all employees be associated and "Sadbhavana Pledge" be administered. The text of the pledge is enclosed.

(Pankaj Dhamija)
Under Secretary to the Govt. of India
☎ 011 -23384072

Encl.: Text of Sadbhavana Pledge

To

All Union Ministries/Departments and State/UT Governments

सद्भावना दिवस प्रतिज्ञा

मैं प्रतिज्ञा करता/करती हूँ कि मैं जाति, सम्प्रदाय, क्षेत्र, धर्म अथवा भाषा का भेदभाव किए बिना सभी भारतवासियों की भावनात्मक एकता और सद्भावना के लिए कार्य करूंगा/करूंगी। मैं पुनः प्रतिज्ञा करता/करती हूँ कि मैं हिंसा का सहारा लिए बिना सभी प्रकार के मतभेद बातचीत और संवैधानिक माध्यमों से सुलझाउंगा/सुलझाउंगी।

SADBHAVANA DAY PLEDGE

I take this solemn pledge that I will work for the emotional oneness and harmony of all the people of India regardless of caste, region, religion or language. I further pledge that I shall resolve all differences among us through dialogue and constitutional means without resorting to violence.